सूचना का अधिकार

# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
## बृहन्मुंबई खंडपीठ

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वयेदाखल झालेली तक्रार**

**रामाआ- तक्रार क्र. बीएम- ६५५/२०१८**

**तक्रारकर्ता श्री. विश्वनाथ नारायण शिंदे**

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा सहकारी अधिकारी श्रेणी-१ (सहकार कक्ष) मुंबई शहर**
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, अनंत काणेकर मार्ग,
प्रशासकीय इमारत, बांद्रा (पूर्व) मुंबई -४०० ०५१.

**प्रथम अपिलीय अधिकारी**
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, अनंत काणेकर मार्ग,
प्रशासकीय इमारत, बांद्रा (पूर्व) मुंबई -४०० ०५१.

**तक्रार अर्ज सुनावणी दिनांक : ०७.०५.२०२४**

| | | |
|---|---|---|
| तक्रारकर्ता | : | उपस्थित |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित (ट्रॅकिंग रिपोर्टप्रमाणे दि. २६.०४.२०२४ रोजी नोटीस प्राप्त झाली आहे.) |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित (ट्रॅकिंग रिपोर्टप्रमाणे दि. २६.०४.२०२४ रोजी नोटीस प्राप्त झाली आहे.) |

आयोगाने यापूर्वी अपील क्र.अपील क्र. MHSICMU/२०१८/M/००३९७८ प्रकरणी आयोगाने दि.२६.११.२०१८ रोजी पुढीलप्रमाणे निष्कर्ष नोंदवून आदेश पारित केले आहेत :-

*"सकृतदर्शनी जन माहिती अधिकाऱ्यांनी अपिलार्थींना अंशतः माहिती दिलेली आहे. उक्त संस्थेच्या लेखापरीक्षण अहवालाबाबत आतापर्यंत करण्यात आलेल्या कार्यवाहीचा तपशिल उदा. कार्यालयीन टिपणी, संस्थेस दिलेल्या नोटीसाचा अभिलेख अपिलार्थींना देणे आवश्यक आहे.*

*आदेश- जन माहिती अधिकाऱ्यांना असे आदेश देण्यात येत आहेत की, त्यांनी दि. १०.१२.२०१८ पर्यंत या प्रकरणी उपलब्ध असलेली माहिती, अपिलार्थींना विनामुल्य पोस्टाने पाठवावी. या आदेशासह अपील अंशतः मान्य करुन निकाली काढण्यात येत आहे."*

उक्त आदेशानुषंगाने अपिलार्थी यांचा द्वितीय अपील अर्ज तक्रार क्र. ६५५/२०१८ मध्ये दाखल करण्यात आला असून सदर तक्रार अर्जावर आज दि. ०७.०५.२०२४ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली आहे.

सुनावणीच्या वेळी तक्रारकर्ता उपस्थित असून जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

..२/-

या प्रकरणी कोणतेही आदेश पारीत करण्यापूर्वी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांचे मत जाणून घेणे आवश्यक असून या प्रकरणावर सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे.

**आदेश**

**सदर प्रकरणी पुढील सुनावणी दि. ११.०६.२०२४ रोजी दुपारी ०२.३० वाजता घेण्यात येईल.**

**मुंबई** **(डॉ. प्रदीप व्यास)**
**दिनांक : ०८.०५.२०२४** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**रामाआ- तक्रार क्र. बीएम- ६५५/२०१८**
**तक्रारकर्ता श्री. विश्वनाथ नारायण शिंदे**
**सुनावणी दिनांक : ११.०६.२०२४ (In continuation of order dt ०८.०५.२०२४)**

सुनावणीच्या वेळी तक्रारकर्ता व जन माहिती अधिकारी उपस्थित असून जन माहिती अधिकारी त्यांचे निवेदन दि. ११.०६.२०२४ आयोगास सादर करुन नमुद केले की, सदर संस्थेचे आर्थिक व्यवहाराच्या अनुषंगाने काही मुद्यांची चौकशी झाली नसल्याने सदर प्रकरण पुन्हा विशेष लेखापरिक्षक, सहकारी संस्था यांच्याकडे पुन्हा तपासणीसाठी देण्यात आले आहे. तपासणी अहवाल प्राप्त झाल्यानंतर पुढील कारवाई करण्यात येईल.

तक्रारकर्ता यांचे म्हणणे आहे की, त्यांना तपासणी पत्राची प्रत मिळाली आहे.

या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग पुढील आदेश देत आहे:

**आदेश**

**तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.**

(State Information Commission, Greater Mumbai)

**मुंबई** **(डॉ. प्रदीप व्यास)**
**दिनांक : १२.०६.२०२४** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**